# सध्याच्या युगात महात्मा गांधीच्या विचारांचे महत्व

**डॉ.अनिल रा.कडू** ,राज्यशास्त्र विभागप्रमुख, स्व.पंचफुलाबाई पावडे महिला महाविद्यालय वरूड,जि. अमरावती

........................................................................................................................

**प्रस्तावना :-**

मानवी जीवनाच्या सर्वागांन विषयाना स्पर्श करणारे जे विचार व्यक्त केलेले आहेत. त्यावरून महात्मा गांधीचे विचार आज ही प्रेरणादायी ठरते. आधुनिक काळातील समाजाला भ्रष्टाचार, बेकारी, दहशतवाद अशा विविध समस्यानी ग्रासलेले आहे. या सर्व समस्या सोडवून भारताला निकोप बनविण्यासाठी गांधीजीच्याविरांची खऱ्याअर्थाने आजही गरज आहे. गांधीजीचे विचार हे विचार नसुन ती एक जीवनधारा आहे. अण्णा हजारे यांनी लोकपाल विधेयक आणि भ्रष्टाचाराला विरोध करण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग पत्कारला 12 दिवसाच्या या सत्याग्रहाला संपुर्ण देशातून प्रचंड प्रतिसादला भला आंदोलनाला प्रतिसाद देणाऱ्यामध्ये सर्वात जास्त तरूण वर्गाचा भरणा होता. काळाच्या पडद्याआड गेलेली गांधी टोपी अगदी लहानपणापासून तर मोठापर्यत सर्वांच्या डोक्याचे भुषण झाली. यावरून आजही भारतातील तरूण पिढी गांधीजीच्या विचारांना सकारात्मक दृष्टीने पाहते. हे अण्णा हजाराच्या सकारात्मक आंदोलनातून सिध्द झाले. आजच्या घडीला गांधीजीचे विचारकाल बांह्य झालेली आहे. परंतू एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, विचारांनी समाज चालतो समाजाने विचार चालत नाही. एखादी गोष्ट जर तुम्हाला मान्य नसेल तर त्यांचा विनयशील दृष्टीने विरोध करणे हे तत्व कोणालाही लागू आहे. ही संकल्पना मांडून गांधीजीनी लोकांना वैचारिक स्वातंत्र्याची देणगी दिली. एखादा विचार आत्मसात करणे व न पटलेल्या विचारास विरोध करणे हे गांधीजीनी मानवी जीवनास दिलेली सर्वात मोठे योगदान आहे.

भारतीय स्वतंत्र्य लढ्यात महात्मा गांधीजीची कामगीरी जशी महत्वाची होती तशीच त्यांची शिक्षण क्षेत्रातील कामगीरी तेवढीच महत्वाची ठरली आहे. शिक्षणासंबधी विचारमंथन केले नसुन संपुर्ण शिक्षण योजना सादर केली. आजही शिक्षण योजनेनुसार देशात शिक्षण पध्दती नसली तरी त्यांच्या शिक्षण योजनेतील अनेक तत्व मान्य केले आहे. आजच्या युगात व मावनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्य अंहिसेची उपासनाचा पुजारी होईल काळाची गरज आहे.

भारतीय स्वतंत्र आदोलंनामध्ये महात्मा गांधीचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. ते आदर्शवादी व युगप्रवर्तक होते. ते प्रामुख्याने अध्यात्मकवादी व मानवतावादी विचारवंत ओळखले जातात धर्म व राजकारण यांचा सुदंर समन्व य्साधून त्यांनी राजकारणाला व्यवहारीक अशी नवी अध्यात्मकवादी दृष्टी दिली. आधुनिक भारताच्या निमीर्तीस महात्मागांधीना एक महत्वाचे स्थान आहे. भारतातील अनेक राजकिय नेत्यांवर त्यांचा प्रभाव पडला होता. 1920 ते 1948 हा कालखंड राजकिय नेत्यांवर त्यांचा प्रभाव गांधीयुग म्हणुन ओळखला जातो. गांधीजीचा जनमाणसावर प्रभाव होता.

**महात्मा गांधीनी दिलेले महत्व**

1) महत्मा गांधीजीना अपृश्यता मान्य नव्हती.

2) महात्मा गांधीजीनी हिंदी भाषेला महत्व दिले.

3) महत्मा गांधीनी लघु उद्योगाना महत्व दिली.

4) महात्मा गांधीनी प्रौढ व स्त्रि शिक्षणास महत्व दिले.

5) महात्मा गांधी हे अराज्यवादी होत .

6) महात्मा गांधी राज्या पेक्षा समाजाला महत्व देतात.

7) महात्मा गांधीनी सामाजिक, आर्थिक, व राजकिय प्रगतीला महत्व दिले.

8) महात्मा गांधीनी ग्रामीण भागाचा विकास याला सर्वात महत्व दिले.

9) महात्मा गांधीनी सर्वागीन विकासयाला अधिक महत्व दिले.

10) अध्यात्मिक विकासाला महत्वदिले.

11) कृतितुन बौध्दीक विकासाला महत्वदिले.

12) जिवनापयोगी महत्व दिले.

आजच्या युगात जागतिक महासत्ता बनवण्याच्या घौडदौडीमुळे अनेक राष्ट्रे अनुचाचण्या करून आपण महासत्ता असण्याल्याचा दावा करीत आहेत. अनुशंक्तीमुळे जगाच्या संहार होईल. यात तीळमात्र शंका नाही जागतिककरणाच्या प्रक्रियेमध्ये शंततेचा संदेश देवून मार्गदर्शकतत्वामध्ये समाविष्ट झालेले विचार आजही केद्र सरकार व राज्यसरकार यांना प्रेरणादायी ठरत आहे.

भारतीय संविधानाचा चौथ्या परीशिष्टामध्ये समाविष्ट असलेले थोर महात्माचे विचार म्हणजे महात्मागांधीनीच्या स्वपनातील भारत होय, राज्यसकार व केंद्रसरकार हे करताना दिसतात.

ज्या स्वतंत्र भारताचे मुद्राचित्र बापुजीनी आणि समकालीनांनी पाहिले होते ते चित्र कधी सुदंर बनलेच नाही ग्रामीण भागाकडे सरकार म्हणून विकासात्मक असणाची भुमिका केवळ वरवर दिसते बापुजीनी शहराकडून ग्रामीण भागात चला संदेश दिला होता. खेडयातील जीवन सुधरावे म्हणुन गांधीजीनी खेडयाकडे चला असा संदेश दिला होता आत खेडयात पाहिलेत्या प्रमाणात जीवनमान सुधारलेले दिसत नाही. आजही मुलभूत सुविधा पासुन ग्रामीण कोसे मैलदुर आहे. ग्रामीण भागाचा विकासया ध्येयाला प्राधान्य दिले पाहिजे. भारत हा खेडयांचा शेती प्रधान देश आहे. खेडांचा विकास म्हणजे भारताचा विकस ग्रामीण जिवन भ्रष्ट होवू नये याची काळजी घेतली पाहिजे शेतकरी सुखी तर देश सुखी हे लक्षात ठेवा खेडयात प्रत्येकाला काम मिळाले तर लोकाची रिघ शहराकडे लागणार नाही. गांधीजीच्या निधानंतर औद्यागिकरण जड उद्योगांना प्राधान्य देणारे धोरण आखले परिणामतः शहराच विकास झाला खेडी आसोड बनली लोक आजही शहराकडे पोटभरण्यासाठी जाऊ लागले. खेडे म्हणजे म्हाताऱ्यांचे गाव अशी ओळख निर्माण झाली. कारण गावातील तरूण युवकवर्ग शहराकडे रोजगांरासाठी जात असल्यामुळे गावचीगाव भकास झाल्याची दिसते. अशा विकासाचापर्याच गांधीना अजिबात मान्य नव्हाता. विनाकारण रल्वेचे डबे ही वाढवू नका असात्यांचा सल्ला होता.

**निष्कर्ष :-**

खेडी स्वयं पुर्ण स्वलांबी व्हावी म्हणजे स्थानिक लोकाच्या गरजा स्थानिक पातळीवरच भागविल्या जाव्यात तर लोकसुखी व स्वतंत्र होतील ग्रामस्वराज्य म्हणजे गावातील सर्व प्रश्न गावातच सोडवण्याची जाबाबदारी गावांवर शहरावर अवलंबून राहणे म्हणजे एक प्रकारचे पारवलंबनच न्याय निवडा करण्याचा अधिकार गावाला असावेत. महात्मा गांधीच्या रामराज्याच्या संकल्पनेतुन ग्रामराज्याची संकल्पना उदयास आली असली तरी गावपातळीवर निर्माण झालेली संसद केवळ राजकिय इच्छा विना आज ही गावाचा कल्याणकारी विकास खुटंलेला दिसतो त्यासाठी सकारात्मक दूरदृष्टी असणे नितांत गरजेचे झालेआहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने थोर महापुरूषांच्या स्वप्नातील भारत निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

**संदर्भग्रंथ:-**


1) डॉ. भोळेना.य.राजकिय विचारांचा इतिहास, कॅन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 30 प्रथमआवृत्ती, डिसेंबर 1969

2) डॉ. व्होरा राजेद्र राज्यशास्त्र कोश पळशीकर सुहास दास्ताने रामचंद्र आणि क पुणे,प्रकाशित 1987

3) गांधी संपुर्ण वाड्:मय भाग 6 (भारत सरकार प्रकाशान विभाग सुचना आणि प्रसारण मंत्रालय)

4) डॉ.डी.आर.पाटील, महात्मा गांधी विचार व समकालीन समाज प्रकाशक व मुद्रक श्रीयुवराज माळी अथर्व पब्लिकेशन्स प्रथमआवृत्ती 2012

5) डॉ.डी.डी. पाटील, महात्मा गांधीची युवकासाठी विचारधारां, डॉ.डी.बी.पाटील,अथर्व पब्लिकेशन्स प्रथम आवृत्ती15एप्रिल 2011

6) गांधी एम के सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा मराठी अनुवाद पटवर्धन सिताराम पुरूषोत्तम माणिक प्रकाशन, कोल्हापुर

7) गांधी एंव आंम्बेडकर कितने दुर कितने पास, डॉ. श्याममोहनअग्रवाल, रितु पब्लिकेशन्स, जयपूरप्रथमसंस्करण 2013

8) गांधी, नेहरू और टैगोर,प्रकांश नारायण नाटाणी, पोइन्टर पब्लिकशर्स जयपूर, दुतीय संस्करण, 2012